- ‘महिला आरक्षण विधेयकासाठी सर्वसहमती अभियान’
- महिला आरक्षण ३३% पेक्षा खाली आणू नका.
- महिला आरक्षण कमी न करता विधेयक पास करा.
- महिला आरक्षणाचे प्रमाण कमी होऊ नये यासाठी राष्ट्रव्यापी अभियान

गेली १३ वर्षे विवाद्य ठरलेले महिला आरक्षण विधेयक लवकरात लवकर सभागृहात आणण्याचे शासनाचे प्रयत्न स्वागतार्ह आहेत. मात्र विरोधकांच्या दबावाखाली आरक्षणाचे प्रमाण कमी केल्यास तो स्त्रियांचा विश्वासघात ठरेल. स्त्रियांच्या हिताशी अशी तडजोड करण्यापेक्षा लोकसभेतील जागा वाढवून स्त्री-पुरूषांना समान प्रतिनिधित्व देण्यासाठी मतदारसंघ व्दिसदस्य करण्याचा तोडगा अधिक व्यवहार्य ठरू शकतो. स्त्री-पुरूष समानतेसाठी हे विधेयक लवकरात लवकर पास व्हावे म्हणून भारतीय स्त्री शक्तिने अभियान हाती घेतले आहे अशी घोषणा ‘भारतीय स्त्री शक्तिच्या’ अध्यक्ष आणि ‘महिला आरक्षण विधेयकासाठी सर्वसहमती अभियानाच्या’ निमंत्रक डॉ. मेधा नानिवडेकर यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

फिरत्या आरक्षणाच्या तरतूदीमुळे महिला आरक्षण विधेयक पास झाल्यास तीन निवडणुकांत वेगवेगळया १८१ पुरूष खासदारांना आपला मतदार संघ गमवावा लागेल. आजवर बिल पास न होण्याचे ते खरे कारण आहे. फिरते आरक्षण विद्यमान स्त्री खासदारांसाठीही तोटयाचे आहे. कारण त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या मतदारसंघातून न लढता महिला आरक्षण मतदारसंघातून लढण्याची सक्ती राजकीय पक्ष करू लागतील. आज नगरसेविकांबाबत हेच घडते आहे. याउलट लोकसभेचे सर्व ५४३ मतदारसंघ व्दिसदस्य मतदारसंघ केल्यास ५४३ पुरूष आणि ५४३ स्त्रिया लोकसभेत येतील. पुरूष खासदारांची सध्याची संख्याही यामुळे वाढेल. मतदार संघाची संख्या किंवा हद्दींमध्ये बदल न करता या जागा वाढवता येतील. अनुसूचित जाती-जमातींच्या १३० मतदारसंघांतून त्या प्रवर्गातील एक

स्त्री आणि एक पुरूष निवडून येतील.ओबीसी आरक्षणाच्या वादावरही यातून तोडगा निघेल असा दावा डॉ. मेधा नानिवडेकर यांनी केला. सध्याच्या विधेयकात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा समाविष्ट केला तरी फारतर ५० जागा ओबीसी स्त्रियांना मिळतील. शिवाय पुरूषांसाठी खुल्या राहणा-या एकूण जागा आणखीच कमी होतील. व्दिसदस्य मतदारसंघांत मात्र अनुसूचित जाती-जमातींचे १३० मतदारसंघ सोडल्यास उरलेल्या ४१३ ठिकाणी कितीही ओबीसी वा अल्पसंख्य महिलांना उमेदवारी देणे राजकीय पक्षांना शक्य होईल. सध्याच्या विधेयकातील १५ वर्षाचा काळ संपल्यावर आरक्षण रद्द होऊन स्त्रियांचे प्रमाण पुन्हा खाली येण्याचा धोकाही टळेल. १९५१ पासून साडेतीन पट वाढलेल्या लोकसंख्येमागे खासदार दुप्पट करण्यासाठी खर्च वाढला तर ते समर्थनीय आहे असेही डॉ.मेधा नानिवडेकर म्हणाल्या.

स्त्रियांच्या आरक्षणाचे प्रमाण कमी न होता महिला आरक्षण विधेयक लवकरात लवकर संमत व्हावे यासाठी हे अभियान छेडले आहे.हे अभियान चालविण्यासाठी राष्ट्रीय समन्वय समिती गठित करण्यात येणार आहे. अभियानाच्या राष्ट्रीय समन्वय समितीत सहभागी होऊ इच्छिणा-या संघटना, गट, संस्था व व्यक्तींनी संपर्क साधावा असे आवाहनही डॉ. मेधा नानिवडेकर यांनी केले.सध्या भारतीय स्त्री शक्ति व शिवाजी विद्यापीठ स्त्री अभ्यास केंद्र यांच्यासह भारतीय स्त्री शक्ति जागरण (पुणे), साद-संवाद (कोल्हापूर), जागृती महिला मंडळ(लातूर),स्त्री चेतना (केरळ) यांनी अभियानास पाठिंबा जाहीर केला आहे असे भारतीय स्त्री शक्तिच्या महासचिव नयना सहस्रबुध्दे यांनी सांगितले.

भारतीय स्त्री शक्तिच्या संघटनसचिव निर्मला आपटे, मुंबई शाखेच्या अध्यक्ष स्नेहा पंडित आणि सचिव वर्षा तावडे पत्रकार परिषदेस उपस्थित होत्या.

(संपर्कासाठीः भारतीय स्त्री शक्ति, वाकोला वेल्फेअर सेंटर, कदमवाडी, मुंबई -४०००५५.दूरध्वनी ९८५०३९७४८५. medhananivadekar@yahoo.com)